शंकरराव चव्हाण यांचे मराठवाड्याच्या जलसिंचन कार्यातील योगदान

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. संशोधनासाठीचा सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

कैलाश दशरथ कपाटे

(M.A. Economics, B.Ed. SET)

मार्गदर्शक

डॉ. संजय पी. काळे

(M.A. Economics, Ph.D.).

सह प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य आणि विज्ञान

महाविद्यालय, भोकर जिल्हा नांदेड

संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र

स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

ऑगस्ट 2023

शंकरराव चव्हाण यांचे मराठवाड्याच्या जलसिंचन कार्यातील योगदान

प्रस्तावना (Introduction)

शंकरराव भाऊराव चव्हाण हे महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री आणि भारताचे केंद्रीय मंत्री होते. त्यांचा शेतकरी कुटुंबात औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथे जन्म झाला. प्राथमिक शिक्षण पैठण येथे घेवून पुढे उस्मानिया (हैदराबाद) विद्यापीठातून ते बी.ए., एल. एल. बी. झाले. 1945 मध्ये त्यांनी वकिलीची सनद मिळवली. पण स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सल्लयाने ते हैदराबाद मुक्ती संग्रामात सहभागी झाले. यवतमाळ जिल्हयात पुसद तालुक्यात उमरखेड हे गाव त्यांच्या कार्याचे केंद्र होते. 17 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थान भारतान सामील झाले. येथून खऱ्या अर्थाने शंकरराव चव्हाण यांच्या दुसऱ्या टप्यातील कारकीर्दीस सुरुवात झाली. त्यांच्या कार्याची खरी सुरुवात नांदेड नगरीतून म्हणजेच नांदेड जिल्हयातन झाली. ते कॉग्रेस पक्षाचे एकनिष्ठ होते. 1948-49 मध्ये नांदेड जिल्हा काँग्रेसचे ते सरचिटणीस झाले. 1952 च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झला. पण ते या घटनेतुन खचले नाहीत. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे अध्यक्ष आणि हैदराबाद राज्य सहकारी बँकेचे संचालक झाले. 1960 मध्ये पाटबंधारे व वीज खात्याचे ते मंत्री झाले, त्यांनी पाटबंधारे क्षेत्रात भरीव कामगीरी केली. कृष्णा-गोदावरी पाणी तंट्यात त्यांची भुमिका वाखाण्या सारखी आहे, तसेच पुर्णा आणि मांजरा प्रकल्पामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळाली. तसेच पैनगंगा प्रकल्पाची उभारणी करुन त्या पाण्याचा वापर नांदेड जिल्हयाच्या सिंचन क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात केला. या मुळे नांदेड जिल्हयातील अर्धापुर, नांदेड, मुदखेड, भोकर, धर्माबाद या तालुक्यासाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन दिली. त्याचा दुरपरिणाम मराठवाड्यातील शेतकरी उत्पादन क्षमता वाढवण्यावर झाला. जल सिंचनाचा मराठवाड्यात सुविधा उपलब्ध केल्यामुळे व मराठवाड्याच्या विकासाला चालना देण्यासाठी सहकारी तत्वावर त्यांनी अर्धापुर तालुक्यात भाऊराव चव्हाण सहकारी साखर

कारखाण्याची उभारणी केली. मोठ्या प्रमाणात मराठवाड्यातील नवशिक्षीत वर्गास रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या.

या वर्गास रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन दिल्या. त्यांची परिणिती आज मोठ्या प्रमाणत रोजगार मराठवाड्यात उपलब्ध झाला असल्याचे आपणास दिसते. त्याच प्रमाणे मराठवाडा विकासासाठी त्यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत देखील महत्वपुर्ण कार्य केले या बँकेमार्फत सर्व सामान्य समजल्या जाणारा शेतकरी व कामगार वर्गास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी कर्ज पुरवठा नांदेड जिल्ह्यातील नागरीकांना उपलब्ध करुन दिल्या. एवढेच नाही तर लघु उद्योग, लहान आणि मध्यम उद्योगांना या बँकेमार्फत कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिल्या.

विष्णुपुरी प्रकल्प म्हणजे शंकररावांनी नांदेडच्या मातीला आणि नांदेड वासियांना बहाल केलेले अमृतकुंभ आहेत. पुढे शंकरराव चव्हाण यांनी आपल्या मुख्यमंत्र्याच्या कार्यकाळात कापूस एकाधिकारी योजना, घरकुल योजना, रेल्वे रुंदीकरणासारख्या अनेक योजना राबवल्या. त्यांच्या पाटबंधारे क्षेत्रातील कामगीरीबद्दल त्यांना महाराष्ट्राचे जलसंस्कृतीचे जनक म्हणून संबोधले जातात. आपल्या 50 वर्षांच्या कालावधीत त्यांनी दोन वेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद व केंद्रात संरक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री यासारखे अनेक महत्वाची खाती सांभाळली. अशा महत्वाच्या पदावर राहुन देखील त्यांनी आपली मातीसोबत असणारी नाळ तोडली नाही व जनसामान्यात आपल्या कार्याचा एक वेगळाच ठसा निर्माण केला. त्यांच्या या कारकीर्दीत त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा कोणताही आरोप झालेला नाही. शंकरराव हे मितभाषी, कर्तव्यदक्ष प्रशासक आणि अभ्यासूवृत्तीचे व्यक्तीमत्व होते आणि त्यांच्या या गुणामुळेच ते जनमानसात जलनायक व लोकनेता या नावाने रुढ झाले. नांदेडचा एक कर्म योगी म्हणून त्यास संबोधले तर वावगे होणार नाही. शंकरराव यांच्या शिवाय मराठवाड्याचा विचार करणे देखील फार मोठी चुक ठरेल म्हणून मराठवाड्याच्या विकासात शंकरराव चव्हाण यांचे योगदान मोलाचे आहे. या महान नेत्याचा मृत्यु 26 फेब्रुवारी 2004 ला झाला. मराठवाड्याच्या विकासातील एक पर्व संपले.

संशोधन समस्या :

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात देशामध्ये विकासाचे वारे अतिशय गतीने वाहण्यास सुरुवात झाली. तत्कालीन देशात विशिष्ट जिल्ह्यातुन तसेच विभागातून नवनविन कार्यकर्ते समोर येऊ लागले. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाडा हा हैद्राबादच्या निजामाच्या अखत्यारीमध्ये होता. मराठवाड्यातील निजामाचे आठही जिल्ह्यातील लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक पिळवणूक केली होती. या विभागात असणाऱ्या जनतेपुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या होत्या. त्यातील मराठवाडा तर हैदराबाद संस्थानाला लगत असल्याने या जिल्ह्याने अनेक वाईट घटनाचे प्रत्यक्षपणे आकलण केले होते. सुरुवातीस मराठवाड्याची आर्थिक स्थिती अतिशय दयनीय होती. ह्या जिल्ह्यास मराठवाड्यातील इतर जिल्हा प्रमाणे कसे पुढे आणावयाचे तसेच या जिल्ह्याच्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या समस्या कशा पध्दतीने सोडावयाच्या यासारखे अनेक प्रश्न महाराष्ट्राच्या निर्माण झाले होते. इतर जिल्ह्याच्या मराठवाड्याची स्थिती देखील भयावह होती. या स्थितीमधून मराठवाड्याला अलगद बाहेर काढण्यांचे कार्य शंकरराव चव्हाण यांनी केले. शंकरराव चव्हाण यांनी नांदेडच्या विकासाचे मॉडेल मांडले नाही तर मराठवाड्याच्या सुधारीत जिल्ह्या जिल्ह्यातील छ. संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा प्रमाणे इतर जिल्हे अग्रेसर निर्माण व्हावे यासाठी शंकररावांनी अनमोल प्रयत्न केले असल्याचे दिसते.

आजच्या कालावधीत मराठवाड्याचा अगदी झपाट्याने विकास होतांना आपण पाहतो. विशेषतः उद्योग, व्यापार, कला, सांस्कृतीक, कृषी इ. क्षेत्रात मराठवाड्याचे नाव अग्रगण्या स्वरुपात घेतले जात आहे. येवढेच नाही तर महाराष्ट्रातील प्रगत जिल्हाच्या यादीत मराठवाड्यातील जिल्ह्यांचा देखील समावेश होत आहे. याचे मुख्य श्रेय शंकरराव चव्हाण यांनी केलेल्या कार्याची पोचपावती मराठवाड्याला मिळाल्याचे दिसत आहे. यामुळे शंकरराव चव्हाणांच्या कार्याचा मराठवाड्याच्या विकासात केलेला प्रयत्न त्याचा लेखा जोखा अभ्यसणे हे आज क्रमप्राप्त झाले आहे.

संशोधनाची उद्‌दिष्टे :

शंकरराव चव्हाण यांचे मराठवाड्यातील जलसिंचन कार्यातील योगदानाला अभ्यास करताना संशोधनाची खालील उद्‌दिष्टे विचारात घेतलेली आहेत.

1. मराठवाड्याच्या स्थितीचा आर्थिक अभ्यास करणे.
2. शंकरराव चव्हाण यांचा मराठवाड्यातील पाणी व्यवस्थापवन व जलसिंचनाच्या कार्याचा अभ्यास करणे.
3. शंकरराव चव्हाण यांनी मराठवाड्यातील सहकारी क्षेत्रातील विविध वित्तीय संस्था व सहकारी उद्योगांचा आढावा घेणे.
4. मराठवाडा विभागातील नांदेड जिल्ह्याचे स्थान व प्रगती याचा अभ्यास करणे.
5. मराठवाड्यातील कृषी उत्पादन आणि रोजगार स्थितीचा लेखाजोखा मांडणे.

संशोधनाची गृहितके:

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने काही गृहितके खालील प्रमाणे दिलेली आहेत.

1. मराठवाड्यातील आर्थिक स्थितीत महत्वपूर्ण बदल निर्माण होत आहेत.
2. शंकरराव चव्हाण यांच्यामुळे जल व्यवस्थापन व सिंचनात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या आहेत.
3. मराठवाड्यातील सहकारी पतसंस्था व उद्योग यांच्यात देखील डॉ. शंकराव चव्हाण मुळे वाढ झाली होती.
4. मराठवाड्याच्या प्रगतीमध्ये व आर्थिक विकासामध्ये डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या कार्यामुळे भर पडली आहे.
5. मराठवाड्याची जलसिंचनामुळे उत्पादन क्षमता वाढुन रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या,

संशोधनाचे महत्व :

आर्थिक विकासात जल सिंचन, जल व्यवस्थापन उद्योग, जल विभाजन, उद्योग उद्योगामध्ये लघु उद्योग, कुटीर उद्योग, उत्पादन, उत्पन्न, विपनन, बाजारपेठ इ. घटकांच्या आर्थिक विकासात अंतर्भाव केला जातो. संशोधनाचे महत्व स्पष्ट करतांना यामध्ये दोन घटकात परस्पर सहसंबंध व्यक्त केला जातो परस्पर सहसंबंधातुन तुलनात्मक विकासाला आढावा घेता येतो. मराठवाडवाड कृषी प्रदान विभाग म्हणून ओळखला जातो. जसी भारताची अर्थव्यवस्था कृषी प्रदान आहे देशात जवळपास 70% लोक जवळपास कृषी व कृषीशी संबंधीत व्यवस्थायाशी निगडीत कार्य करतात. त्याच प्रमाणे मराठवाडा लोकांचा मुख्य व्यवसाय हा देखील कृषी हाच आहे. या जिल्हयातील 65% शेतकरी जवळपास कृषी क्षेत्राशी संबंधीत आहेत. या लोकांच्या विकास साधावयाचा असल्यास कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात चालना देणे महत्वाचे आहे. यातुन कृषी क्षेत्रास बारमाही पाणी म्हणजेच सिंचनाची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यासाठी पैनगंगा प्रकल्प व विष्णुपुरी प्रकल्प यांची व्यवस्था निर्माण केली आहे. त्यांनी त्या कालावधीत घेतलेला हा निर्णय आज देखील नांदेड वासियांनी पाण्याची काळजी मिटवणारा निर्णय आहे, यातुन मराठवाडा विकासाला चालना प्राप्त झाली आहे. पैनगंगा प्रकल्पातून सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. सहाकरी बँके मार्फत अल्पदराने गरजू शेतकरी वर्गास कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला आहे. यामुळे शेतकरी वर्गाची उत्पादन क्षमता वाढवण्यास मोलाची मदत झाली. उत्पादन वाढलयाने निर्यात वस्तुला मोठ्या प्रमाणात चालना प्राप्त झाली तसेच शेतीवर व शेती मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची देखील त्यांनी उभारणी केली. साखर उद्योगास चालना दिली व इतर उद्योगांची पायाभुत उभारणी करुन मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. शिक्षण, वाणिज्य व्यापार उद्योग या सारख्या विविध क्षेत्रात प्रगतीला वाढता ठेवण्याचे कार्य शंकरराव चव्हाण यांनी केल्याचे दिसते.

मराठवाड्याच्या विकासामध्ये शंकरराव चव्हाण यांचा वाटा मोलाचा मानला जातो त्यांच्या कार्याशिवाय मराठवाड्याच्या प्रगतीला किंवा विकासाला अभ्यास करणे शक्य नाही महाराष्ट्रातील व 36 जिल्हयातील प्रगती किंवा विकासाला अभ्यास करता यामध्ये मराठवाड्याचे नाव प्रगतीमध्ये आपणास आग्रक्रमाने घ्यावे लागते. हे नाव अग्रक्रमाने घेण्यासाठी ज्यांनी मोलाचे कार्य केले त्यात शंकरराव चव्हाण यांचे नाव प्रथम क्रमांकावर घ्यावे लागेल म्हणुन त्याच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी शंकराव चव्हाण यांचे मराठवाड्यातील जलसिंचन कार्यातील योगदान हा अभ्यास करणे महत्वाचे मानले आहे. कारण आजही अनेक तालुक्यातील अनेक गावे जलसिंचनाच्या प्रतिक्षेत आहेत.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यास करतांना द्‌वितीय साधनाचा वापर करण्यात आला आहे. शासकीय अहवाल संदर्भग्रथ शोध निबंध, मासिके पाक्षीके इ. साधन सामुग्रीचा अभ्यास करुन विषयाची माहिती घेतली आहे. तसेच प्रस्तुत संशोधनात माहिती संकलनात तयार करण्यात येणारी मुलाखत अनुसुची मराठवाड्यातील उत्तरदात्याकडुन भरुन घेतल्या नंतर मुलाखत अनुसुची पुर्व तपासणी करुन प्रश्नावलीचे मुल्यांकण करण्यात येईल संरचित मुलाखत हे निरीक्षणाचे महत्वाचे तंत्र आहे या तंत्राचा वापर करुन प्राथमिक साधनाचा वापर केला आहे. तसेच सांखीकीय तंत्रामधील F आणि T टेस्ट तंत्राचा वार केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

विषयाचा अभ्यास करतांना काही व्याप्ती व मर्यादा निश्चित केल्या आहेत.

1. संशोधन हे मराठवाड्या पुर्ते मर्यादीत आहे.
2. संशोधनासाठी 1961 ते 2001 या कालावधीत शंकराव चव्हाण यांचे जलसिंचनाचे कार्य विचारात घेतले आहे.
3. सहकारी वित्तीय पुरवठा व जलसिंचन यांच्या समन्वयातुन झालेला विकास यांच्या आढावा घेतला आहे.

संशोधनाचा आराखडा :

प्रकरण पहिले: प्रस्तावना व पूर्वअभ्यास

प्रकरण दुसरे : मराठवाडा विभागाची सर्वसाधारण माहिती

प्रकरण तिसरे : शंकरराव चव्हाण यांचे मराठवाडा विभागातील सहकार क्षेत्रातील कार्य

प्रकरण चौथे : शंकरराव चव्हाण यांचे जलसिंचन आणि जलव्यवस्थापन क्षेत्रातील कार्य

प्रकरण पाचवे : मराठवाडा विभागातील लाभार्थ्यांचा नमूना अभ्यास

प्रकरण सहावे : निष्कर्ष सूचना व शिफारशी

संदर्भग्रंथ :

1. श्री रंजन कोळंबे, “भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन पुणे बारावी आवृत्ती जानेवारी 2018"
2. M.L. JHINGN, Macro Economics Theory, 2009
3. M.L. JHINGN, Modern Microeconomics, 2009
4. तुकाराम जाधव व महेश शिरापुरकर, मानवी हक्क, 2020
5. डॉ. तुषार घोरपडे, पर्यावरण परिस्थिती, दिशा प्रकाशन पुणे, 2018
6. डॉ. किरण जी देसले, अर्थशास्त्र, दीपस्तंभ प्रकाशन, पुणे
7. योजना, लोकराज्य, ॲग्रोवन मासिके
8. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोन, नांदेड जिल्हा सांखिकी संचालनालय,
9. डॉ. सुरेश सावंत, महाराष्ट्राचे शिल्पकार, शंकरराव चव्हाण (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई)
10. देशमुख श्रीकांत हानमंतराव, मराठवाड्याच्या विकासात शंकरराव चव्हाण यांचे योगदान.
11. सावंत यु.एस. ना. शंकररावजी चव्हाण यांचे जीवन कार्य.
12. Shankarrao Chavan Biography Video

संशोधक
कैलाश दशरथ कपाटे
(M.A. Economics, B.Ed., SET)

मार्गदर्शक
डॉ. संजय पी. काळे
(M.A. Economics, Ph.D.)
सह प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
दिगांबरराव बिंदू कला, वाणिज्य आणि विज्ञान
महाविद्यालय, भोकर जिल्हा नांदेड
संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड